ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक: २५ मार्च, २०२६

**शुध्दीपत्र**

क्रमांक:-ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३१/ई-१४०९६२३/पं.रा.२- शासन आदेश क्रमांकः ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३१/ई-१४०९६२३/पं.रा.२, दिनांक १७/०२/२०२६ च्या आदेशान्वये माहे जानेवारी, २०२६ ते माहे डिसेंबर, २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम देण्यात आला आहे. काही जिल्हाधिकारी कार्यालयांकडून प्रभाग रचना करावयाच्या ग्रामपंचायतींची संख्या जास्त असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय व विभागीय आयुक्त कार्यालय यांच्यावर प्रशासकीय कामकाजाचा अतिरिक्त ताण निर्माण होणार असल्याने जिल्हा परिषद व पंचायत समितीप्रमाणे ग्रामपंचायतींची प्रभाग रचना जिल्हाधिकारी स्तरावरुन प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ते आदेश होण्याची विनंती करण्यात आली आहे. तथापि, **यापूर्वी वरील आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार आज रोजीच्या टप्प्यापर्यंत कार्यवाही झाली असल्यामुळे, ज्या जिल्ह्यांनी कार्यवाही केली आहे, त्यास संरक्षण राहील** व त्यापासून पुढे दिलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार कार्यवाही करावी.

**(१) प्रारुप प्रभाग रचना तयार करणे:-** अ.क्र.१ मधील iv) मध्ये **"उप विभागीय अधिकारी"** या मजकुराऐवजी **"तहसिलदार"** तसेच **"जिल्हाधिकारी"** या मजकुराऐवजी **"उप विभागीय अधिकारी"** असे वाचावे.

**(२)** अ.क्र.१ मधील v) मध्ये **"जिल्हाधिकारी"** या मजकुराऐवजी **"उप विभागीय अधिकारी"** असे वाचावे.

**(३) प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचनाः-** अ.क्र. २ मधील iii) मध्ये **"प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे"** या मजकुराऐवजी **"प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनावर तहसिलदार यांनी त्यांच्या अभिप्रायासह उप विभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे"** असे वाचावे.

**(४)** अ.क्र. २ मधील iv) मध्ये **"प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उप विभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे"** या मजकुराऐवजी **"प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उप विभागीय अधिकारी यांनी आवश्यक असल्यास सुनावणी घेणे"** असे वाचावे.

**(५)** अ.क्र. २ मधील v) मध्ये **"आलेल्या प्रत्येक हरकती व सूचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे"** या मजकुराऐवजी **"आलेल्या प्रत्येक हरकती व सूचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करणे"** असे वाचावे.

(६) प्रभाग रचना अंतिम करणे:- अ.क्र. ३ मधील i) मध्ये "उप विभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना अंतिम करुन राज्य निवडणूक आयोगास सादर करणे" या मजकुराऐवजी "उप विभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रास झालेले प्रस्ताव तपासून राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांनी प्रभाग रचना अंतिम करावी" असे वाचावे.

(७) अ.क्र. ३ मधील ii) मध्ये "राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या अंतिम प्रभाग रचनेला जिल्हाधिकारी यांनी (नमूना-अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे" या मजकुराऐवजी "राज्य निवडणूक आयोगाने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या अंतिम प्रभाग रचनेला तहसिलदार यांनी (नमूना-अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व. मुं. भरोसे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रतः- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
४. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रतः- कार्यासन पं.रा.२, निवडनस्ती.